MHAH020033002022

**रे.मु.नं. ६१३/२०२२**

अनिल दत्तात्रय राळेभात/पवार
विरूध्द
महाराष्ट्र सरकार व इतर

## निशाणी क्र. ५ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अंतर्गत दाखल केला असून सदर अर्जाद्वारे त्यांनी गट क्र. ४८ क्षेत्र ३ हेक्टर १६ आर मौजे कोळगाव, तालुका श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर (यानंतर 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येईल) या मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी भारत गॅस पाईपलाईन टाकण्याचे काम सुरु करू नये अशा तुर्तातूर्त मनाई हुकूमाची मागणी केली आहे.

२. दावा मिळकत वादी यांच्या मालकी कब्जेवहिवाटीची असून प्रतिवादी क्र. ५ ही भारत गॅस कंपनी असून सदर कंपनीने प्रतिवादी क्र. ६ या कंपनीला पाईपलाईन टाकण्याचे काम दिले आहे. वाद शेतजमीन मिळकतीच्या उत्तरेकडून पूर्व–पश्चिम देऊळगाव–ढोरजा, कोथूळ–कोळगाव बैलगाडी रस्ता असून सदर रस्त्याचे विस्तारीकरणाकरिता दावा मिळकत संपादीत झाली नाही. सदर रस्त्याच्या दुरुस्तीमध्ये काही ठिकाणी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करून रस्त्याचे कामकाज झाले आहे. प्रतिवादी क्र. ६ ने शेतजमिनीमधून पाईपलाईन टाकण्याचे अनधिकृत काम सुरू केले आहे. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी दावा मिळकत संपादीत केली नाही तसेच प्रतिवादी क्र. ५ व ६ यांनी दावा मिळकतीजवळ पाईपलाईन टाकण्यासाठी यंत्रसामग्री आणून ठेवली. दावा मिळकतीमध्ये वादींची पीव्हीसी पाईपलाईन तसेच आंब्याची झाडे असून प्रतिवादींकडून पाईपलाईन टाकल्यास त्याचे नुकसान होणार आहे. प्रतिवादी यांनी पाईपलाईन टाकण्यासाठी कोणत्याही प्रकारे जमीन संपादीत केली नाही आणि सदर कामामुळे वादींचे उभे पीक तसेच रस्त्यालगत असणाऱ्या

झाडांचे नुकसान होणार आहे. प्रतिवादी क्र. ५ व ६ हे वाद शेतातून पाईपलाईन टाकण्यासाठी मार्किंग करीत असल्याने वादींनी अडविले असता त्यांना धमकी दिली. वादीनुसार प्रतिवादी हे जमीन संपादीत न करता त्यांच्या मालकीच्या जमिनीतून पाईपलाईन टाकण्याचे काम करीत आहेत. वरील कारणास्तव त्यांनी तुर्तातूर्त ताकीद अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी निशाणी क्र.४३ वर व प्रतिवादी क्र. ५ ने नि.क्र.४६ वर म्हणणे दाखल करुन खालील प्रमाणे आक्षेप घेतला आहे.

प्रतिवादी क्र. ५ सीएनजी गॅस पाईपद्वारे जिल्हा व तालुक्यामध्ये वाणिज्य व घरगुती वापराकरिता सीएनजी गॅसचा पुरवठा वितरण व विक्री करण्याचे काम करते. सदरचे काम पायाभूत सुविधा प्रकल्पमध्ये मोडत असून त्यावर भारत सरकारचे नियंत्रण आहे. प्रतिवादी क्र. ५ ला अहमदनगर व औरंगाबाद जिल्ह्यातील शहर व तालुक्यामध्ये सीएनजी गॅस पाईपलाईन टाकण्यासाठी दिनांक २८.०९.२०१८ रोजी मंजुरी मिळाली आहे. प्रतिवादी क्र. ५ यांनी देऊळगाव–ढोरजा–कोथूळ–कोळगाव या मार्गावर सुरू केलेल्या गॅस पाईपलाईनचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या परवानगीने ठरवून दिलेल्या हद्दीमध्ये सुरू केले असून वादींच्या शेतजमिनीत अतिक्रमण करून कोणतेही नुकसान केले नाही. प्रतिवादी करीत असलेले काम पायाभूत सुविधेअंतर्गत मोडत असून सदर कामाबाबत आक्षेप घेण्याचा अधिकार वादींना नाही. गॅस वितरण करण्याकरिता पाईपलाईन टाकण्याचे काम भारत सरकारचा उपक्रम लोकहिताकरता असल्याने तुर्तातूर्त ताकीद दिल्यास जनसामान्यांचे नुकसान होणार आहे. त्यांनी अर्ज नामंजूर करण्यास विनंती केली आहे.

४. उभयतांचा युक्तिवाद तसेच अर्ज नि.क्र. ५ आणि प्रतिवादींचे म्हणणे पाहता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यास मी निम्न कारणांसह उत्तरे देत आहे –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादींच्या बाजूने प्रथमदर्शनी केस आहे काय? | ... नाही. |
| २. | वादींच्या बाजूने समतोलाचा कौल आहे काय? | ... नाही. |
| ३. | तुर्तातूर्त आदेशात्मक मनाई हुकूम न दिल्यास वादींना अपरिमित नुकसान होणार आहे काय? | ... नाही. |
| ४. | काय आदेश? | अर्ज नामंजूर करण्यात आला. |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दे क्र. १ ते ४ करिता –</u>

५. ही कबुली बाब आहे की, सदरचा दावा पूर्वी श्रीगोंदा न्यायालयात दाखल करण्यात आला होता आणि प्रकरण इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्टशी संबंधित असल्याने दावा विशेष न्यायालयात वर्ग करण्यात आला. स्पेसिफिक रिलीफ ॲक्ट कलम २०ब प्रमाणे इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्टशी संबंधित दावे विशेष न्यायालयाला चालविण्याचे अधिकार आहेत.

६. दावा मिळकतीच्या मालकीबाबत प्रतिवादींनी आक्षेप घेतला नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादी हे सामान्य जनतेला गॅस वितरण करण्याकरिता पाईपलाईन टाकण्याचे काम करीत आहेत याबाबत सुद्धा वाद नाही. वादीनुसार प्रतिवादी हे दावा मिळकत संपादीत न करता सदर जमिनीतून पाईपलाईन टाकत आहेत. प्रतिवादीनुसार ते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यातील क्षेत्रामध्ये व त्यांनी ठरवून दिलेल्या हद्दीमध्ये पाईपलाईन टाकत आहेत.

७. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावर दाखल कागदपत्रांची पाहणी केली. प्रतिवादी करीत असलेले काम इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये मोडते याबद्दल वाद

नाही. स्पेसिफिक रिलीफ ॲक्ट कलम २०अ प्रमाणे जर एखाद्या मनाई हुकुमाच्या आदेशामुळे इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्टच्या वाटचालीला तसेच पूर्ण व्हायला अडथळा येत असेल तर मनाई हुकुमाचा आदेश पारीत करता येणार नाही. प्रतिवादीने सदर प्रकरणात कागदपत्र दाखल करून सांगितले की, पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. कागदपत्रांची पाहणी केली असता त्यात असे नमूद केले आहे की, पाईपलाईनचे काम पूर्ण झाले असून तपासणीसाठी तयार आहे.

८. तुर्तातूर्त ताकीद अर्ज निकाली काढताना प्रथमदर्शनी केस व समतोलाचा कौल पाहणे गरजेचे आहे. वादीनुसार प्रतिवादी हे दावा मिळकतीतून पाईपलाईन टाकण्याचे काम करीत आहेत. सदर कथनाच्या पुष्ट्यर्थ कोणताही प्रथमदर्शनी पुरावा नाही. ही कबुली बाब आहे की, पाईपलाईन टाकण्याचे काम जनहितासाठी असून इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्टमध्ये मोडते. त्याचप्रमाणे सदरचे काम पूर्ण झाल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल आहे. वरील कारणांमुळे वादींच्या बाजूने प्रथमदर्शनी केस व समतोलाचा कौल नाही. पुढे असे की, तुर्तातूर्त ताकीद आदेश दिल्यास सामान्य जनतेच्या हक्कावर परिणाम होणार आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ ते ३ ची उत्तरे नकारार्थी ठरवतो आणि मुद्दा क्र. ४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

## आदेश

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात यावा.

दिनांक – ३१.०१.२०२४
ठिकाण – अहमदनगर.

सही/-
(एम. एस. तिवारी)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
अहमदनगर.
J.O. Code : MH01580